17 MAY 2025
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबईत राजभवनात 'सिक्कीम स्थापना' दिवस


## शिवाजी विद्यापीठाचा सहभाग : विद्यार्थ्यांकडून लोकनृत्य, गीताचे सादरीकरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : सिक्कीम राज्याचा ५० वा राज्य स्थापना वर्धापन दिवस राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन, मुंबई येथे आज साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन यांनी मार्गदर्शन केले. 'आज काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देश प्लास्टिक कचऱ्याने विद्रूप होत आहे. सिक्कीम मात्र देशातील सर्वाधिक कमी प्रमाणात प्लास्टिकचा वापर करणारे ते राज्य ठरले आहे. ही गोष्ट महाराष्ट्रासह इतर सर्व राज्यांनी शिकण्यासारखी असून युवकांनी किमान आपला परिसर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प केला तर देश पुन्हा एकदा सुजलाम् सुफलाम् होईल, असे प्रतिपादन त्यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सिक्कीमचे लोक नृत्य घोंटू आणि लोकगीत लेपचा तसेच सिक्कीमचे राज्यगीत उत्कृष्ट सादर केल्याबद्दल तसेच कुलदीप जठार, श्रद्धा चराटकर या विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून सिक्कीम येथील तरुणीचे सुंदर चित्र साकारल्याबद्दल तसेच ओंकार गोमासे या विद्यार्थ्याने सिक्कीम येथील लोकजीवनाचे तैलचित्र काढल्याबद्दल राज्यपालांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाने तयार केलेला 'सिक्कीम : पॅराडाईज ऑफ इंडिया' हा माहितीपट दाखविण्यात आला. उत्कृष्ट कला सादरीकरण केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन समितीचे सदस्य, विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूचे सदस्य उपस्थित होते. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले. अवर सचिव सुशील मोरे यांनी आभार मानले.




**मुंबई** : 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने सिक्कीम राज्याचा ५० वा राज्य स्थापना वर्धापन दिवस शुक्रवारी साजरा झाला. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत सहभागी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी.

# विद्यापीठात राष्ट्रभक्ती जागृती सप्ताहातंर्गत रक्तदान शिबिर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारत-पाकिस्तान युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशभर 'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह' साजरा करण्याबाबत कुलपती कार्यालयाने निर्देशित केले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठामार्फत 'देशभक्ती सप्ताह' १३ ते २० मे या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. याची सुरूवात म्हणून मंगळवारी दसरा चौक ते बिंदू चौक, छत्रपती शिवाजी चौक आणि पुन्हा छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालयामार्गे दसरा चौक अशी प्रभात फेरी काढली. प्रभात फेरीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे यांचेसह दीडशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

याच 'उपक्रमाचा भाग म्हणून १७ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या कालावधीत विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच रक्ताचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन विद्यार्थी, शिक्षक, इच्छुक रक्तदाते आणि समाजातील सजग नागरिकांनी या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणात रक्तदान करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
17 MAY 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती संभाजी महाराज यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तुकाराम चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव आदी उपस्थित होते.

17 MAY 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात माजी सैनिक, अधिकाऱ्यांचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशभक्ती सप्ताहांतर्गत शिवाजी विद्यापीठांत सिक्युरिटी विभागामध्ये कार्यरत संरक्षण दलातील माजी सैनिक व अधिकारी यांनी देशासाठी दिलेली सेवा आणि योगदानाबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सन्मान केला.



**कोल्हापूर : देशभक्ती सप्ताहांतर्गत शिवाजी विद्यापीठांमध्ये सिक्युरिटी विभागामध्ये कार्यरत कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सन्मान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते गौरव चिन्ह व शाहू महाराजांचे चरित्र देऊन विद्यापीठाच्या सेवेत असणारे ३७ माजी संरक्षण दलातील सेवकांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी चीफ सिक्युरिटी ऑफिसर शिवाजी शिंदे, त्याचबरोबर बोर्ड ऑफ स्टडीचे उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी सेवेतील अनुभव सांगितले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागातर्फे उपक्रमाचे आयोजन केले होते.

17 MAY 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या तीन लघुपटांचा महोत्सवात दबदबा

**संदीप आडनाईक**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील तब्बल तीन कलाकृतींना देशातील प्रतिष्ठेच्या चित्रपट महोत्सवात केवळ नामांकनच नव्हे, तर मानाचे पुरस्कारही मिळालेले आहेत. विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा 'मेटाफर', शाहूवाडी तालुक्यातील किरण पोटे यांचा 'शाळा सुटली' आणि कागल तालुक्यातील धीरज बोडके याच्या 'रुबिक्स क्यूब' या लघुपटांनी हे कौतुक मिळविलेले आहे. 'मेटाफर' या लघुपटात डॉ. शिवाजी जाधव, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सक्षमीकरणाचा मुद्दा हाताळला.

**मेटाफर :** 'मेटाफर' या स्त्रीप्रधान लघुपटाचे मुंबईतील प्रतिष्ठेच्या यशवंत लघुपट महोत्सवात यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये स्क्रीनिंग झाले. तिथे ख्यातनाम दिग्दर्शक जब्बार पटेल, नामवंत छायालेखक महेश लिमये, पटकथा लेखक मनीषा कोरडे, चित्रपट समीक्षक गणेश मतकरी यांनी कौतुक केले. साहिल धेंडे आणि प्रवीण पांढरे या दोन विद्यार्थ्यांनी याचे दिग्दर्शन केले आहे.




**रुबिक्स क्यूब :** वाळवे खुर्द (ता.कागल) येथील धीरज यशवंत बोडके यांनी 'रुबिक्स क्यूब' या लघुपटाची निर्मिती केली आहे. दिल्ली येथे दादासाहेब फाळके फिल्म फेस्टिव्हल मध्ये विशेष पुरस्कार आणि कोलकाता येथील रेड इन्कार्नेशन फिल्म फेस्टिव्हलमध्ये तब्बल सात पुरस्कार मिळाले आहेत. या लघुपटाची २८ देशांतील विविध महोत्सवासाठी निवड झाली



**शाळा सुटली :** ड्रीम रिबन मुंबई निर्मित आणि मदन मिरजकर प्रस्तुत शाहूवाडी तालुक्यातील किरण पोटे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'शाळा सुटली' या लघुपटाला देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये बेस्ट चाइल्ड शॉर्ट फिल्म म्हणून एक आणि बेस्ट चाइल्ड आर्टिस्ट म्हणून मिथ्याच्या भूमिकेसाठी शौर्य अनिल पाटील याला एक असे दोन पुरस्कार मिळाले आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील १०३ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे १०३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.




विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीए., बीएस्सी., बीसीए., बीआयडी, बीबीए., बीई., बॅचलर ऑफ लॉ, एमबीए., एमए. आदी ८७ अभ्यासक्रमांच्या १६५ परीक्षा केंद्रावर झाल्या. परीक्षेला ४३ हजार २६३ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १६ रोजी बीएस्सी. (फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट) बायोटेक्नॉलॉजी या सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2025
पुढारी

# विद्यापीठ प्रवेश परीक्षेला ३६३ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शुक्रवारी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षेला ३६३ विद्यार्थी उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागांत पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा सुरळीत होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दि. १६ रोजी विविध केंद्रांवर आठ विषयांच्या परीक्षांचे आयोजन सकाळी १०.३० ते १२, दुपारी १ ते २.३० व ३.३० ते ५ या तीन सत्रांत करण्यात आले. परीक्षेला ४४१ विद्यार्थ्यांपैकी ३६३ विद्यार्थी उपस्थित होते, तर ७८ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेस विद्यार्थी बसण्याचे प्रमाण ८४.२२ टक्के आहे.